निविदा फॉर्म शुल्क : रू.१०००/-

Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर-४१६००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

जा.क्र.कोविमं/भांडार/ 749

दिनांक : 06 JUN 2024

प्रति,

------------------------

------------------------

------------------------

**विषय :- कार्यालयात टेबल, खुर्च्या व फॅन या साहित्याचा पुरवठा करणेसाठी दरपत्रके मागविणेबाबत...**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर या कार्यालयात टेबल, खुर्च्या व फॅन या साहित्य खरेदी करण्याचे प्रस्तावित असून त्याकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत. **त्यांचे अंदाजित निविदा मूल्य २,३९,०००/- (दोन लाख एकोणचाळीस हजार फक्त) आहे.**

त्यासाठी खालील अटी व शर्तीस अधिन राहून सोबत जोडलेल्या तपशिलाप्रमाणे सीलबंद दरपत्रके **दिनांक** ..06/06/2024.. **ते दिनांक** ..12/06/2024...या कालावधीत मागविण्यात येत आहेत. **दिनांक** ..12/06/2024... **रोजी दुपारी ४.०० नंतर** प्राप्त होणारी दरपत्रके कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दरपत्रकासाठी 'अ ' व ' ब ' लिफाफा पध्दत आहे.

**'अ ' लखोट्यात सादर करावयाची कागदपत्रे**

१. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये अद्ययावत व्यवसाय नोंदणी परवान्याची छायाप्रत.
२. पॅन कार्डची छायाप्रत (आधारकार्डशी संलग्न असलेली)
३. GST नोंदणी प्रमाणपत्राची छायाप्रत.

**'ब' लखोट्यात सादर करावयाची कागदपत्रे**

१. मंडळाचे अधिकृत दरपत्रके.

## अटी व शर्ती

१. परिपूर्ण भरलेली दरपत्रके कार्यालयात दिनांक ...12/06/2024. रोजी कार्यालयीन वेळेत दुपारी ४.०० पर्यंत कार्यालयाच्या आवक जावक शाखेत नोंद करुन समक्ष अथवा पोष्टाने सादर करावीत. त्यानंतर प्राप्त झालेली दरपत्रके कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाहीत.

२. सर्व करांचा समाविष्ट करुन दरपत्रके भरण्यात यावीत. मान्य दराव्यतिरिक्त इतर कोणतीही दरवाढ अथवा वेगळा आकार दिला जाणार नाही.

३. दरपत्रकातील नमूद तपशिलाप्रमाणे टेबल, खुर्च्या व फॅन हे साहित्य कार्यालयात सुस्थितीत पोहोच करण्याची जबाबदारी मान्य पुरवठादार याची राहील.

४. सदरील साहित्य हे दरपत्रकातील नमूद कंपनीचे व प्रकारचे असणे आवश्यक आहे.

५. सदर साहित्याची गॅरंटी/वॅारंटी पिरीयडमध्ये मोडतोड झाल्यास किंवा त्यात काही बिघाड झाल्यास साहित्य बदलून देण्याची किंवा दुरूस्त करून देण्याची जबाबदारी आपली राहील.

६. सदर चे साहित्य प्राप्त झाल्यानंतर ते सुस्थितीत असल्याची खात्री झाल्यानंतरच देयकाची रक्कम धनादेशाव्दारे अदा केली जाईल. देयकामधून शासन नियमानुसार TDS व GST ची रक्कम कपात करण्यात येईल.

७. दरपत्रके उघडण्याची तारीख दूरध्वनीव्दारे कळविण्यात येईल. आपण स्वतः किंवा प्रतिनिधीनी उपस्थित रहावे. प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्यास त्यास प्राधिकृत केल्याबाबतचे लेखी पत्र असणे बंधनकारक आहे.

८. कोणतेही दरपत्रक पुर्णतः/ अंशतः स्विकारणे अगर नाकारणे याचा अंतिम अधिकार मा.विभागीय अध्यक्ष यांनी राखून ठेवलेला आहे.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर